# प्रेस नोट दि.२८/०८/२०१९
## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर
## मिसिंग व्यक्तीचा शोध घेवुन त्यास त्यांचे पत्नीचे ताब्यात देवुन उल्लेखनिय कामगीरी केलेबाबत....

दि. २६/०८/२०१९ रोजी तक्रारदार सौ. रेखा बाळु आरे, वय-२५ वर्षे, रा. देवकर चाळ, राममंदीरामागे, आंबेगांव पठार, पुणे यांनी मनुष्य मिसिंगची तक्रार दिली की, त्यांचे पती श्री. बाळु रामभाऊ आरे, वय-३५ वर्षे, रा. सदर त्यांचेवर असलेल्या कर्जाच्या टेन्शनमुळे दि. २२/०८/२०१९ रोजी कामावर जातो असु सांगुन घरातुन निघुन गेले परंतु दि. २६/०८/२०१९ रोजी पर्यत परत न आल्याने मनुष्य मिसिंग नोंदविण्यात आली.

तपासी अंमलदार यांनी पोना ५७४ दत्तात्रय पवार व पोशि ९१७९ ब्रम्हानंद केंद्रे यांनी त्यांचे नातेवाईक तसेच इतर मित्रांकडे चौकशी करुन त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, परंतु मिसिंग व्यक्ती मिळुन आली नाही. त्यांचा तपास चालु ठेऊन त्यांचे भाऊ, नातेवाईक व मित्राचे संपर्कात राहुन त्यांचेबाबत माहिती घेत होते. सदरची माहिती घेत असताना, त्याचे बंधु याचे मार्फतीने मिसिंग व्यक्ती पुणे स्टेशन येथे असल्याचे समजले असता, त्यांचे भावाचे मार्फतीने त्यास पोलीस ठाणेस आणुन पोउनि विक्रांत डिगे यांनी त्यांचे चांगल्या प्रकार समुपदेशन करुन त्यांना अशा प्रकारे अचानकपणे घरातुन निघुन जाण्यापासुन परावृत्त केले. मिसिंग व्यक्ती श्री. बाळु रामभाऊ आरे यांनीही यापुढे अशा प्रकारे मनात वाईट विचार न आणता असे घरातुन निघुन जाणार नसल्याचे सांगितले.

त्याबाबत त्यानी पत्नी सौ. रेखा बाळु आरे यांनी कृतज्ञता व्यक्त करून पोलीस दलाचे आभार मानले.

